ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख २२ जून, १९५५ | अंक २५

## विविध माहिती

**सुरुंग काढणाऱ्या बोटी**—भारताच्या नाविकदलाला सुरुंग काढणाऱ्या व टारपेडो बोटी सध्यां परदेशांतून विकत घ्याव्या लागतात. परंतु कलकत्त्याच्या एका कारखान्यानें परदेशीय मदतीनें अशा प्रकारच्या बोटी भारतांत तयार करण्याची तयारी दाखविली आहे. भारतीय कंपनी जर्मन व फ्रेंच तज्ज्ञांची मदत मिळविणार आहे. भारताचें संरक्षणखातें ह्यासंबंधीं विचार करीत आहे.

**दिल्लीचें पुरापासून संरक्षण**—दिल्ली शहराचें पुरापासून संरक्षण करण्याची योजना नियोजन-समितीनें मंजूर केली आहे. योजनेसाठी १७ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. हा खर्च नॉर्दर्न रेल्वे आणि भारतीय सरकारचें वहातूक खातें वाटून घेतील. यमुना नदीच्या डाव्या तीरावर बांध घालून पुरावर नियंत्रण ठेवण्यांत येईल.

**म्हैसूर राज्यांत नवे उद्योग-धंदे**—म्हैसूर राज्याची अधिक औद्योगिक उन्नति करण्यासाठी राज्य-सरकारनें जनतेकडून सूचना मागविल्या आहेत. ज्या व्यक्तींना अगर संस्थांना स्थानिक गरजांची व साधन-संपत्तीची माहिती असेल त्यांनीं नवे धंदे काढण्यासाठी अगर जुन्यांचा विस्तार करण्यासाठी आपल्या योजना पाठवाव्या, अशी सूचना करण्यांत आली आहे.

**डबाबंद फळांचा कारखाना**—म्हैसूरच्या सरकारनें डबाबंद फळांचा कारखाना काढण्याचें ठरविलें असून त्यासाठी बंगलोर शहराजवळ योग्य अशी जागा निवडण्यांत येणार आहे. कारखान्याचें अधिकृत भांडवल १० लाख रुपये असेल व त्यापैकीं ४·५ लाख रुपये वसूल भांडवल असेल. त्यापैकीं दोन लाख रुपयांचें भांडवल म्हैसूर सरकार घेणार आहे.

**माकडाच्या फुप्फुसाचा उपयोग**—कॅनडामधील टोरोंटो शहरांत १९ वर्षांच्या एका मुलीच्या हृदयावर शस्त्रक्रिया करण्यांत आली. ह्या प्रसंगीं माकडाच्या फुप्फुसाचा शुद्ध रक्तवाहिनीसारखा उपयोग करण्यांत आला. शस्त्रक्रिया होईपर्यंत रक्त फुप्फुसाच्या द्वारां अभिसरण पावत होतें. माकडाचें फुप्फुस जवळ जवळ माणसासारखेंच असतें.

**'हैदराबाद हाउस'ची विक्री**—हैदराबाद राज्य-सरकारनें आपली मुंबईतील 'हैदराबाद हाउस' ही इमारत ५५ लाख रुपयांना विकून टाकली असल्याचें समजतें. राज्य-सरकारच्या मालकीच्या लंडन, दिल्ली व उटकमंड येथील इमारतीहि विकून टाकण्यांत येणार असल्याची वार्ता आहे. इमारती विकून आलेला पैसा विकास-योजनांवर खर्च करण्यांत येणार आहे.

**आंतरराष्ट्रीय बँकेचीं कर्जें**—चालू आर्थिक वर्षांत इंटरनॅशनल बँक सुमारें ४० कोटी डॉलर्सचीं कर्जें देईल, असें बँकेचे अध्यक्ष श्री. युजेन ब्लॅक ह्यांनीं सांगितलें आहे. बँकेचें आर्थिक वर्ष ३० जूनला संपतें. ह्या वर्षी बँकेची प्राप्तीहि अधिकांत अधिक म्हणजे २·४ कोटी डॉलर्स होईल असें ते म्हणाले. गेल्या वर्षी बँकेची प्राप्ति सुमारें २ कोटी डॉलर्स झाली.

**मुंबई राज्याचा शिक्षणावरील खर्च**— मुंबई राज्य-सरकार राज्यांतील शिक्षणासाठी सुमारें १५ कोटी रुपये दरवर्षी खर्च करते, अशी माहिती खात्याच्या उपमंत्री कुमारी इंदुमती शेठ ह्यांनीं सांगितली. ही रक्कम राज्याच्या उत्पन्नाच्या जवळ जवळ २१ टक्के आहे. राज्यांत ३२,००० प्राथमिक शाळा, १,५५० माध्यमिक शाळा, आणि १०० कॉलेजें आहेत.

**छोट्या उद्योगधंद्यांसाठी संस्था**—छोट्या उद्योगधंद्यांना साह्य करण्यासाठी भारतीय सरकार ४ संस्था स्थापन करणार आहे. त्यांपैकी तीन मदुरा, मुंबई आणि फरीदाबाद ह्या ठिकाणीं काढण्यांत येतील. चौथी संस्था कलकत्त्यापासून ७ मैलांवर असलेल्या बॅरकपूर रोड ह्या ठिकाणीं काढण्यांत येईल. कलकत्त्याजवळील संस्थेच्या इमारतीसाठी ४० लाख रुपये खर्च यईल.

**ग्रामीण भागांत रेडिओची सोय**—ग्रामीण विभागांत सार्वजनिक रेडिओ पुरविण्यासाठी राज्य-सरकारांना मदत करण्याची योजना मध्यवर्ती सरकारनें आखली आहे. ह्या योजनेप्रमाणें हिमाचल-प्रदेश सरकारनें चालू वर्षांत २४० रेडिओ सेट्सची मागणी केली आहे. हे रेडिओ बसविण्यांत आले म्हणजे राज्यांतील ५०० च्या वर लोकसंख्या असलेल्या प्रत्येक खेड्यांत रेडिओची सोय होईल.

**सौराष्ट्रांतील लोकांचा उत्साह**—सौराष्ट्रांतील १००० च्या वर लोकसंख्या असलेल्या प्रत्येक खेड्यांत प्राथमिक शाळा स्थापन करण्याचें राज्य-सरकारनें ठरविलें होतें. एकूण खर्चापैकी २२ लाख रुपये म्हणजे सुमारें एक तृतियांश रक्कम लोकांकडून जमविण्यांत यावयाची होती. सौराष्ट्रांतील लोकांनीं १४ दिवसांच्या आंत एवढी रक्कम जमविली.

**मोठा हिरा सांपडला**—किंबर्ले येथील हिऱ्याच्या खाणींत ५७२॥ कॅरेट वजनाचा मोठा हिरा सांपडला आहे. हिऱ्याची लांबी सुमारें १ इंच, रुंदी २ इंच आणि उंची तीनचतुर्थांश इंच आहे. ह्यापूर्वी १८९३ सालीं ह्याच खाणींत ९७१ कॅरेट वजनाचा मोठ्यांत मोठा हिरा सांपडला होता.

## पाकिस्तानांतील भोंदू सुधारक

पाकिस्तानी सरकारी नोकरांची बदली झाल्यावर त्यांच्या बदलीचे ठिकाणीं जाण्यासाठी त्यांच्या पहिल्या व दुसऱ्या पत्नीसहि पहिल्या वर्गाचें भाडें मिळतें. प्रमुख पाकिस्तानी लोकांत दुसरा विवाह फॅशनेबल झाला आहे; गृहमंत्रि, व्यापारमंत्रि, व इतर त्यांतच आहेत. सर्व पत्नींना समानतेनें वागवावें, असा कुराणाचा आदेश आहे. पण त्यांतील तत्त्व सोडून दिलें जात आहे. बहुपत्निकत्वाच्या प्रसाराविरुद्ध सुशिक्षित जनता उघडपणें बोलत आहे. अशा वाईट उदाहरणांबद्दल त्यांना खंत वाटते. भारतांत बहुपत्निकत्व गुन्हा होऊं लागलें आहे, त्याच्या उलट पाकिस्तानांत परिस्थिति आहे. एका छोट्या मुत्सद्याची पत्नी म्हणाली कीं, भारतांतील स्त्रियांचेपेक्षा पाकिस्तानांतील स्त्रिया अधिक वेगानें प्रगति करीत आहेत. कदाचित् कराचींत तें खरें असेल — नृत्यगृहांत त्या पुष्कळच उठून दिसतात; आणि लाहोरांतहि तें कदाचित् सत्य असेल, तेथें त्या पार्ट्या झोडायला नेहमीं जातांना दिसतात—पण, पाकिस्तानाच्या बहुतेक भागांत पडद्यामध्यें स्त्रिया हळूहळू मृत्यूला कवटाळत असतात, हें स्पष्ट आहे. पंजाबांत फक्त वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पत्नी बाहेर पडतात; लष्करी अधिकाऱ्यांच्या बहुतेक पत्नी पडद्यांतच असतात. सरहद्दीवरील मुलुखांत, मुलग्यांच्या दृष्टीस पडूं नये ह्यासाठी पडद्यामागें मुली वर्गांतील तासांना बसतात. भारतांत गोपूजेला जें स्थान आहे, तें पाकिस्तानांत पडद्याला आहे. दोन्हींहि धर्ममूलक आहेत. गोमांस खाणारे जेवढे हिंदू असतील, तेवढेच पाकिस्तानी पत्नीला घेऊन बाहेर पडणारे आढळतील! अशा रीतीनें आधुनिक पद्धतीनेंच वागणाऱ्या पाकिस्तानी पुरुषांनींच दोन दोन विवाह करून सुधारणेचे पाय ओढले आहेत पण पाकिस्तानची घटना निधर्मी असावी असें सुचवीत आहेत. पाकिस्तानांतील सुधारणांची घोषणा व आचार ह्यांतील तफावतीचें रहस्य अशा प्रकारचें आहे. ताया झिंकिन लिखित "पाकिस्तानच्या परिवर्तनां"तील हें चित्र निश्चित उद्बोधक आहे. भारतांतील सर्व ठिकाणांपेक्षा महाराष्ट्रांत स्त्रियांची प्रगति अधिक चांगल्या प्रकारें झालेली आहे व येथील स्त्रियांच्या कर्तबगारीचा लौकिक सर्वत्र पसरलेला आहे. येथील स्त्रिया निःसंकोचपणें व निर्भयपणें पण शालीनतेनें सर्वत्र वावरूं शकतात व सामाजिक जीवनास योग्य वळण लावतात, असा अभिप्राय भारतांत व परदेशांत प्रवास व वास्तव्य करून आलेले लोक मोठ्या कौतुकानें सांगत असतात. महाराष्ट्रीयांना भोंदूगिरी माहितीच नाहीं, त्याचेंच हें निदर्शक आहे. जें पटलें तें आचरावें, हाच त्यांचा बाणा आहे. 'सह्याद्रि'

**रेल्वेच्या एंजिनांची प्रेरक शक्ति**—अमेरिकेंतील बफेलो ह्या शहरीं रेल्वेवर काम करणाऱ्या तज्ज्ञांची बैठक भरली होती. ह्या बैठकींत एका तज्ज्ञानें अशी माहिती सांगितली कीं अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यापासून पश्चिम किनाऱ्यापर्यंतच्या रेल्वेमार्गावर लवकरच अणुशक्तीवर चालणारीं एंजिनें धावूं लागतील. दोन्ही किनाऱ्यामधील अंतर ३,००० मैल आहे. भविष्यकालीं एंजिनांसाठी सूर्याची शक्तीहि वापरण्यांत येईल, असेंहि त्यानें सांगितलें.




अन्नाचें रहस्य



बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि. १११ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार–SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. २२ जून, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कोळशाचा खप वाढत चालला

भारतांत दगडी कोळशाचा खप दरवर्षी झपाट्यानें वाढत चालल्यामुळें कोळशाची मागणीहि वाढत चालली आहे. १९५४ सालीं देशांत सुमारें ३.९॥ कोटी टन कोळशाला मागणी येईल असा अंदाज करण्यांत आलेला होता. १९५७ सालीं ४.५ कोटी टन कोळशाला मागणी येईल असें दिसतें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीच्या सुमाराला तर कोळशाची मागणी अधिकच वाढून तीं ५.७ कोटी टनांपर्यंत जाईल अशी शक्यता आहे. कोळशाचें उत्पादनहि वाढत असून १९६० च्या सुमारास ते ६ कोटी टनांपर्यंत जाईल असें वाटत आहे. इतकें उत्पादन झालें तर देशाच्या गरजा भागून सुमारें ३० लाख टन कोळसा भारताला निर्यात करतां येईल. उत्पादन आणि खप वाढल्यावर कोळशाची वाहतूकहि वाढणें अपरिहार्यच आहे. सध्यां भारतीय रेल्वेला ३.२ कोटी टन कोळशाची वहातूक करावी लागते. खपांत वाढ झाल्यावर आणखी सुमारें २.५ कोटी टन कोळशाची वहातूक करावी लागेल. ह्या वाढत्या वाहतुकीची व्यवस्था करणें रेल्वेजना शक्य होईल किंवा नाहीं, ह्याविषयीं तज्ज्ञांकडून शंका व्यक्त करण्यांत येत आहे. कारण, ह्या कामासाठीं लागणारीं साधनें मिळण्यांत बऱ्याच अडचणी आहेत. सध्यांच अशी परिस्थिति आहे कीं, कोळशाच्या मागणीच्या मानानें रेल्वे-वहातुकीची व्यवस्था अपुरी आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत भारताचा औद्योगिक विकास विस्तृत प्रमाणावर करण्यांत येणार आहे. अशा वेळीं कोळशाचा उपयोग करण्यांत फार मोठी काटकसर आणि कार्यक्षमता दाखवावी लागेल, असा अभिप्राय सरकारी गटांत व्यक्त करण्यांत येत आहे.

## भारत मोटारी निर्यात करणार

चालू वर्षाच्या अखेरीस भारतांत तयार झालेल्या मोटारी प्रथमच परदेशांत निर्यात करण्यांत येणार असल्याचें समजतें. प्रारंभीं ब्रह्मदेश आणि सीलोन ह्या देशांत मोटारी निर्यात करण्यांत येणार आहेत. तेथील बाजारपेठेंत थोडाबहुत जम बसल्यावर सवडीनें मध्यपूर्व व इंडोनेशिआ ह्या भागांतहि भारतीय मोटारींची निर्यात करण्यांत येणार आहे. सीलोनमध्यें दरवर्षी सुमारें ५,००० गाड्यांना आणि ब्रह्मदेशांत सुमारें १,५०० गाड्यांना मागणी असते, असा अंदाज करण्यांत आलेला आहे. भारतांत सरकारी परवाना घेऊन मोटारी व ट्रक्स तयार करणारे ५ कारखाने सध्यां आहेत. ह्या सर्व कारखान्यांनीं मिळून १९५४ सालीं ५,४३५ मोटारी आणि ९०२७ ट्रक्स इतकें उत्पादन केलें. भारतांत तयार होणाऱ्या "हिंदुस्थान १४" ह्या मोटारीचे कांहीं भाग देशांत तयार होतात व कांहीं परदेशांतून आणावे लागतात. केवळ किंमतीच्या दृष्टीनें विचार केला तर "हिंदुस्थान १४" मधील ६५ टक्के किंमतीचे भाग देशांत तयार झालेले असतात व उरलेले परदेशांतून आयात केलेले असतात. प्रीमिअर ऑटोमोबाइल कंपनीनें तयार केलेल्या डॉज ट्रक्समध्यें ५० टक्के भाग स्वदेशी असतो. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर ९० टक्के भाग देशांत तयार करण्याचा कंपनीचा मानस आहे. भारतीय मोटारींच्या किंमती इतर परदेशी मोटारींच्या किंमतीच्या मानानें अधिकच असतील. तथापि, बाजारपेठ हस्तगत करण्याच्या दृष्टीनें निर्गत होणाऱ्या मोटारींच्या किंमती कमी करण्यास कारखानदारांना मुभा आहे.

## विजेच्या यंत्रांचा कारखाना

गेल्या मार्च महिन्यांत भारतीय सरकारनें विजेची भारी यंत्रसामुग्री तयार करणारा स्वतःच्या मालकीचा कारखाना काढण्याचें ठरविलें. हा निर्णय ह्यासंबंधीं नेमण्यांत आलेल्या चौकशी-कमिटीच्या शिफारसीप्रमाणें घेण्यांत आला. अशा प्रकारचा कारखाना उभारण्याचें काम करण्याची तयारी कांहीं परदेशी कंपन्यांनीं दाखविली असून त्यांच्याकडून कांहीं योजनाहि आल्या आहेत. ह्या सर्व योजनांची तपासणी करणाऱ्या तज्ज्ञांच्या कमिटीची बैठक दिल्ली येथें भरली होती. कमिटी सरकारनेंच नेमलेली होती. निरनिराळ्या परदेशी कंपन्यांकडून कारखान्याबाबत ज्या योजना सादर करण्यांत आल्या आहेत त्यांची छाननी करण्याचें काम कमिटीनें करावयाचें आहे. त्याचप्रमाणें जरूर वाटल्यास संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींशीं चर्चाहि करण्यांत येणार आहे. सर्व कंपन्यांच्या योजनांची तपासणी पूर्ण झाल्यावर कोणत्या कंपनीकडून अगर कंपन्यांकडून तांत्रिक सल्ला घ्यावा ह्याविषयीं कमिटी सरकारला शिफारस करणार आहे. ज्या कंपनीकडून तांत्रिक सल्ला घेण्याचें ठरेल, तिच्याकडून कारखान्याचा तपशीलवार आराखडा मागविण्यांत येणार असून त्या आराखड्यासंबंधींहि भारतीय तज्ज्ञांची कमिटी सरकारला सूचना करणार आहे. ज्या परदेशी कंपनीकडून कारखान्याची उभारणी करण्याचें ठरेल त्याच कंपनीतर्फे भारतीय तंत्रज्ञांना शिक्षणाहि देण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. भारतीय तंत्रज्ञांना देण्यांत यावयाच्या शिक्षणाचें स्वरूप कसें असावें ह्यासंबंधींचा कार्यक्रम निवड केलेली कंपनीच तयार करील व भारतीय तज्ज्ञ तत्संबंधीं सरकारला सूचना करतील.

## अमेरिकेंतील शेअरमालकांची वाढती संख्या

१९५४ अखेर, अमेरिकेंतील पब्लिक लिमिटेड कंपन्यांच्या पटावर ७५,००,००० भागदार होते. म्हणजे, गेल्या तीन वर्षांत शेअरहोल्डरांची संख्या १०,१०,००० नें (१५% पेक्षा थोडी जास्त) वाढली आहे. १९५१ अखेर त्यांची संख्या ६४,९०,००० एवढी होती. अमेरिकेची लोकसंख्याहि वाढत गेली आहे. ती लक्षांत घेतली तरी १९५१ मध्यें एकूण लोकसंख्येशीं भागदारांचें प्रमाण २४ मध्यें १ असें होतें, तें आतां २० मध्यें २ असें झालें आहे. खाजगी कंपन्यांचे भागदार २०,००,००० आहेत, तें वेगळेच.

# THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LIMITED, POONA.

*Balance Sheet as at 31st December, 1954.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Capital** | | | |
| **Authorised Capital** | | | |
| 10,000 Shares of Rs. 100/-each ... | | | 10,00,000—0—0 |
| **Issued Capital** | | | |
| 10,000 Shares of Rs. 100/-each ... | | | 10,00,000—0—0 |
| **Subscribed and Paid-up Capital** | | | |
| 10,000 Shares of Rs. 100/-each Rs. 75 per share called up ... | | 7,50,000—0—0 | |
| Less— 336 Sahres forfeited ... | | 25,200—0—0 | |
| 9,664 | | 7,24,800—0—0 | |
| Less—calls unpaid ... | | 10,000—0—0 | |
| | | 7,14,800—0—0 | |
| Add—Forfeited Shares ... | | 12,310—0—0 | 7,27,110—0—0 |
| **1A Calls received in Advance** ... | | | 24,100—0—0 |
| **2. Reserve Fund And Other Reserves** ... | | | 2,45,774-15—9 |
| **3. Deposits And Other Accounts** | | | |
| Fixed Deposits ... | | 25,36,922—8—0 | |
| Savings Bank Deposits ... | | 16,72,651-12—1 | |
| Current Accounts, Contingency Accounts, etc. ... | | 20,34,468—2—3 | 62,44,042—6—4 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, Etc.** | | | |
| (i) In India ... | | 0—0—0 | |
| (ii) Outside India ... | | 0—0—0 | |
| **Particulars:** | | | |
| (i) Secured ... | | 0—0—0 | |
| (ii) Unsecured ... | | 0—0—0 | 0—0—0 |
| **5. Bills Payable:** ... | | | 18,678-12—6 |
| **6. Bills For Collection, being Bills Receivable as per Contra** | | | |
| (i) Payable in India ... | | 87,566—5—6 | |
| (ii) Payable Outside India ... | | 0—0—0 | 87,566—5—6 |
| **7. Other Liabilities:** | | | 1,78,414—3—8 |
| **8. Acceptances, Endorsements and Other Obligations as per Contra** ... | | | 0—0—0 |
| **9. Profit and Loss Account:** | | | |
| Profit as per last Balance Sheet ... | | 97,278-12—6 | |
| Less — appropriations: | | | |
| (i) Reserve Fund | 20,000-0-0 | | |
| (ii) Provision for Income-Tax and Corporation Tax | 33,000-0-0 | | |
| (iii) Reserve for Investments | 5,000-0-0 | | |
| (iv) Reserve for Bad and Doubtful Debts | 10,000-0-0 | | |
| (v) Payment of Dividend @ 4% less Tax | 28,572-1-0 | 96,572—1—0 | |
| | | 706-11—6 | |
| Add—profit for the year brought from the Profit and Loss Account. ... | | 63,840—8—4 | 64,547—3-10 |
| Total Rs. ... | | | 75,90,233-15—7 |

# THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LIMITED, POONA.

*Balance Sheet as at 31st December 1954*

## PROPERTY AND ASSETS

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash** | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank ... | | 5,89,082—3—1 |
| **2. Balances with Other Banks** | | |
| (In current account) | | |
| (i) In India ... | 58,791—4—0 | |
| (ii) Outside India ... | 0—0—0 | 58,791—4—0 |
| **3. Money At Call And Short Notice** ... | | 0—0—0 |
| **4. Investments at Cost** ... | | 28,99,239—1—0 |
| (i) Securities of the Central and State Governments and other Trustee securities including Treasury Bills of the Central and State Governments. ... | 28,86,689—1—0 | |
| (Average Market Value Rs. 26,85,109-8-0) | | |
| (ii) Shares : Ordinary Shares fully paid up ... | 12,550—0—0 | |
| (Realisable Value Rs. 12,550) | | |
| (iii) Debentures or Bonds. ... | 0—0—0 | |
| (iv) Other Investments. ... | 0—0—0 | |
| (v) Gold. ... | 0—0—0 | |
| (Investments which have no Market quotations have been shown at their Realisable Value) | 28,99,239—1—0 | |
| **5. Advances** ... | | 36,17,846—0—5 |
| (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors) Particulars as per Schedule. | | |
| (i) Loans, Cash-Credits, Over-drafts, etc. | | |
| (1) In India ... | 35,99,917—8—5 | |
| (2) Outside India ... | 0—0—0 | |
| | 35,99,917—8—5 | |
| (ii) Bills Discounted and Purchased (excluding Treasury Bills of the Central and State Governments). | | |
| (1) Payable in India ... | 17,928—8—0 | |
| (2) Payable outside India. ... | 0—0—0 | |
| | 36,17,846—0—5 | |
| Particulars Of Advances (*See Page 198*) | | |
| **6. Bills Receivable, being Bills for Collection as per Contra** | | |
| (i) Payable in India ... | 87,566—5—6 | |
| (ii) Payable outside India ... | 0—0—0 | 87,566—5—6 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations, as per contra** ... | | 0—0—0 |
| **8. Premises** | | |
| Cost as per last Balance Sheet ... | 25,013—14—0 | |
| Less : Total depreciation written off ... | 6,868—14—0 | 18,145—0—0 |
| **9. Furniture and Fixtures** | | |
| Cost as per last Balance Sheet ... | 40,397—11—0 | |
| Additions during the year ... | 413—13—9 | |
| | 40,811—8—9 | |
| Less : Sales during the year ... | 0—0—0 | |
| Less : Total depreciation written off ... | 15,869—12—9 | 24,941—12—0 |
| **10. Other Assets Including Silver :** | | |
| (1) Interest accrued on Investments ... | 34,771—1—0 | |
| (2) Printing and Stationery on hand ... | 21,625—0—0 | |
| (3) Deposit with Telephone and Electric Companies ... | 2,044—0—0 | |
| (4) Income-Tax paid in advance and at source ... | 35,095—3—0 | |
| (5) Legal Expenses recoverable ... | 1,425—0—0 | |
| (6) Stamps on hand ... | 228—2—0 | |
| (7) Balance in current account with Co-operative Banks | 10,848-15—7 | |
| (8) Advances ... | 20—0—0 | |
| (9) Outstanding Debtors ... | 240—0—0 | |
| (10) Amount of Court expenses etc., due from Mr. K. G. Karnik ... | 3,707—0—9 | |
| (11) Fixed Deposit with Girgaon Co-operative Housing Society, Ltd. ... | 1,00,000—0—0 | 2,10,004—6—4 |
| **11. Non Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** | | 84,617-15—3 |
| **12. Profit and Loss** ... | | 0—0—0 |
| **Total Rs.** ... | | 75,90,233-15—7 |

# THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LIMITED, POONA.

Schedule Referred to on the assets side of the Balance Sheet on page 197

| | Particulars of Advances :— | Loans, Advances Cash Credits & Overdrafts | Bills Discounted & Purchased |
|---|---|---|---|
| | | Rs. As. Ps. | |
| (1) | Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | 22,51,191-11-1 | 17,928—8—0 |
| (2) | Debts considered good for which the Banking Company holds no other security than the Debtors' personal security | 12,46,209—6—4 | ... |
| (3) | Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties, in addition to the personal security of the Debtors. ... | 1,02,516—7—0 | ... |
| (4) | Debts considered doubtful or bad, not provided for. ... | ... | ... |
| | Total Rs. ... | 35,99,917—8—5 | 17,928—8—0 |
| (5) | Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | ... | ... |
| (6) | Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies as members. ... | 1,67,941—9—3 | ... |
| (7) | Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking. Company or any of them either severally or jointly with any other persons | ... | ... |
| (8) | Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of the private companies, as members. ... | 1,72,253—6—6 | ... |
| (9) | Due from Banking Companies. ... | ... | ... |

## *Profit and Loss Account for the Year ending 31st December, 1954*

| EXPENDITURE | Rs. As. Ps. | INCOME : (Less provision made during the year for bad and doubtful debts & other usual or necessary provisions) | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 1. Interest paid on Deposits, borrowings, etc. ... | 1,47,758—9—0 | 1. Interest and Discount. ... | 3,24,792—2-11 |
| 2. Salaries and Allowances and Provident Fund. (including salary and allowance to Managing Director Rs. 10,200/-) ... | 90,716—8—8 | 2 Commission, exchange & brokerage. | 8,899—8—4 |
| 3. Directors' & Local Committee Members' fees and allowances. ... | 1,531—0—0 | 3. Rents. ... | 360—0—0 |
| 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | 4,939-14—0 | 4. Net profit on sale of investments, gold, silver, land premises, and other assets. (not credited to reserves or any particular fund or account). | 0—0—0 |
| 5. Law Charges. ... | 0—0—0 | | |
| 6. Postage, Telegram and Stamps ... | 1,466-14—6 | | |
| 7. Auditor's fees. ... | 1,200—0—0 | 5. Net profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to reserves or any particular fund or account.) ... | 0—0—0 |
| 8. Depreciation on and repairs to Banking Company's property ... | 3,839-8—10 | | |
| 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 6,878-14—0 | 6. Income from Non-Banking assets, and profit from sale of or dealing with such assets. ... | 0—0—0 |
| 10. Loss from sale of or dealing with Non-Banking Assets. ... | 2,838—5—0 | | |
| 11. Other expenditure. ... | 10,035-12—8 | 7. Other receipts ... | 994—4—6 |
| 12. Balance of profit ... | 63,840—8—4 | 8. Loss if any ... | 0—0—0 |
| Total Rs. ... | 3,35,045-15—9 | Total Rs. ... | 3,35,045-15—9 |

G. R. Sathe *Chairman*
D. G. Bapat *Vice-Chairman.*

B. Y. Pathak, *Accountant.* G. D. Joglekar, *Manager.* C. T. Chitale, *Managing Director.*

S. M. Joshi, G. U. Chitale, M. M. Gadre, L. M. Joshi, S. G. Keni — *Directors.*

(Mr. L. R. Dhadphale and Mr. W. P. Vaidya have not signed being out of station).

## AUDITOR'S REPORT TO THE SHARE-HOLDERS

We have audited the foregoing Balance Sheet of the Presidency Industrial Bank Ltd., as at the 31st day of December 1954, and also the foregoing Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which is incorporated the audited return of Bombay Branch and report that :—

(1) We have obtained all the information and explanations we have required and have found them to be satisfactory, (2) The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank. (3) In our opinion, the foregoing Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law. (4) Such Profit and Loss Account, shows a true balance of profit for the year. (5) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of affairs of the Bank according to the best of our information and the explanations given to us and as shown by the books of the Bank, and (6) In our opinion, books of account have been kept by the Bank as required by Section 130, of the Indian Companies Act. 1913.

POONA CITY,
16th March 1955.

B. C. Abhyankar & Co.,
*Chartered Accountants.*

### अमेरिकेंतील लोकप्रिय शेअर्स कोणते!

न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंजच्या 'दि एक्सचेंज' ह्या मासिकानें आपल्या वाचकांकडून मतें मागवून, सर्वांत हव्याशा वाटणाऱ्या शेअर्सविषयीं नुकतीच पहाणी केली. वाचकाला मृत्युपत्रान्वयें ६०,००० डॉलर्स मिळाले, तर ती रक्कम वाचक कोणत्या तीन शेअर्समध्यें गुंतवील, हें त्यानें सांगावयाचें होतें. प्रत्येक कंपनीच्या शेअर्समध्यें २०,००० डॉलर्स गुंतविले जातील व त्यावरील डिव्हिडंडहि त्याच शेअर्सच्या खरेदींत गुंतविण्यांत येईल, हें गृहीत धरावयाचें होतें. वाचकांना आपल्या पसंतीच्या शेअर्सचा १, २ व ३ असा अनुक्रम लावावयाचा होता. एकूण ७,७२७ वाचकांनीं आपलें मत कळविलें, त्यांत वेगवेगळ्या १३०८ कंपन्यांच्या शेअर्सची पसंती आढळून आली. पहिल्या अनुक्रमाचीं १,४७७ मतें अमेरिकन टेलिफोन अँड टेलिग्राफ कंपनीला मिळालीं, दुसऱ्या अनुक्रमाचीं ७२७ मतें स्टँडर्ड ऑइल कंपनीला पडलीं, आणि तिसऱ्या अनुक्रमाचीं ६०० मतें जनरल मोटर्सच्या वांट्यास आलीं. जनरल इलेक्ट्रिक व ई. आय्. ड्यु पाँट दि नेमार्स ह्या कंपन्याचे शेअर्स खालोखाल लोकप्रिय होते. बाकीच्या शेअर्सना एकदम कमी मतें पडलीं.

---

### आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

वरील कंपनीस ३१ डिसेंबर, १९५४ अखेर संपलेल्या वर्षी ३३३ रु. इतका नफा झाला. एकूण विक्री १,२३,१२९ रुपयांची झाली. ठेवींची रक्कम आणखी कमी करून त्यांची एकूण रक्कम आतां फक्त ५०,९०० रु. आहे. कंपनीचें वसूल भांडवल १,१०,४०५ रु. आहे. एकूण खेळत्या भांडवलाशीं ठेवींचें प्रमाण २५% इतकेंच आहे. केवळ पांच वर्षांत कंपनीनें २० हजारांच्या ठेवी परत केल्या. वाढते खर्च संभाळून व कार्यक्षमता टिकवून बाहेरील देण्यांची जबाबदारी कमी करण्याचें संचालकांचें धोरण योग्यच आहे. वसुलीकडे कटाक्षानें लक्ष, रोख विक्रीचें धोरण, बुडीत रकमा लिहून टाकणें, दुकानांची कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न, औषधाचें प्रमाणीकरण, सरकारी निर्बंध आणि त्यांचा आयुर्वेदीय कारखान्यांवर परिणाम, इत्यादींचें सुबोध विवेचन अध्यक्ष, डॉ. वि. ल. आगाशे, ह्यांनीं आपल्या भाषणांत केलें. कंपनीच्या व्यवहाराची व चालकांच्या तत्परतेच्या प्रयत्नांची माहिती त्यावरून स्पष्टपणें येतें.

---

### दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि. अलवाये

वरील कंपनीनें १९५४ मध्यें पूर्वीच्या वर्षाइतकाच कच्चा माल विकला, तरीपण घटलेल्या किंमती, वाढते खर्च उत्पादन-क्षमतेंत घट, संपामुळें उत्पादनांत खंड, इत्यादि कारणांमुळें कंपनीस ३८,८४६ रु. घसारा काढून ९९,५०५ रु. तोटा आला. १९५२ व १९५४ ह्या दोन वर्षांत मिळून तीन संप झाले, त्यांचा प्रतिकूल परिणाम झाला. प्राथमिक अडचणींचें निवारण होऊन ऑटोमॅटिक बॉटल प्लँटचें उत्पादन आतां सुरू आहे, त्यामुळें चालू वर्षी उत्पादनांत वाढ होईल.

कंपनीचें वसूल भांडवल ९,९८,३८० रु. असून तिच्या जनरल रिझर्व्हमध्यें १,११,००० रु. व डिव्हिडंड ई. रिझर्व्हमध्यें ४०,००० रु. आहेत. कंपनीला इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशननें स्थावर तारणावर ३,२५,००० रु. कर्जाऊ दिले आहेत.

---


## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील
पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,१७,००० |
| ठेवी | रु. | ९६,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५२ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष. |
| रावसाहेब यं. द. खोले. | श्री. चं. रा. राठी. |
| श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. धंद्धुके. |

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. | एन्. व्ही. पांडव, मॅनेजर

## स्विट्झरलंडमधील घड्याळांचा धंदा

स्विट्झरलंड हें जगांतील एक छोटें राष्ट्र आहे. पण त्या देशांतील घड्याळें तयार करण्याचा धंदा जगांत आघाडीवर आहे. जगांत जितकीं टाइम पीसेस तयार होतात, त्यांपैकी ९० टक्के स्विट्झरलंडमध्यें तयार होतात. स्वीडनमधून १ पौंड पोलाद जर जिनीव्हाला आणलें तर त्याची किंमत अवघी ५ डॉलर असते. पण स्विस कामगारांनीं त्याच पोलादापासून घड्याळाच्या स्प्रिंगा तयार केल्या कीं त्यांचीच किंमत ५,००० डॉलर्स होते. स्विट्झरलंडमधील घड्याळाचा धंदा ३०० वर्षांपूर्वी सुरू झाला असें म्हणतात. आज हा देश दरवर्षी सुमारें ३,२०,००,००० घड्याळें निर्माण करतो. त्यांतील बहुतेक घड्याळें २,५०० लहान-मोठ्या कारखान्यांत तयार झालेलीं असतात. ह्या कारखान्यांत सुमारें ७०,००० स्त्री-पुरुष कामें करतात. कारखान्यांतून यंत्रसामुग्रीचा वापर करण्यांत येत असला तरी घड्याळें तयार करतांना ६० टक्के काम हातांनींच करण्यांत येतें. घड्याळाच्या कारखान्यांत काम करणारा कामगार चांगला वाकबगार असावा लागतो. त्याला इतर कुशल कामगारांच्या मानानें २० टक्के अधिक वेतन मिळतें. युरोपमध्यें अधिकांत अधिक वेतन मिळविणाऱ्या कामगारांत त्यांची गणना होते. कारखान्यांत तयार होणाऱ्या घड्याळांच्या कितीतरी तऱ्हा आहेत. अंतर मोजणारी, नाडी मोजणारी, श्वास मोजणारी, टेलिफोन कॉलची तीन किंवा पांच मिनिटें झाल्यावरोवर वेळ सांगणारी, पॅरॅशूटच्या साह्यानें उडी टाकणाऱ्यांसाठी सेकंदापेक्षाहि सूक्ष्म वेळ दर्शविणारी, अशीं अनेक प्रकारचीं घड्याळें तयार करण्यांत येतात. अतिशय लहान आकाराचीं घड्याळें तयार करण्यांतहि ह्या देशाचा हातखंडा आहे. एका आफ्रिकन टोळीच्या नायकानें तर आपल्या सोन्याच्या दातांत बसेल एवढ्या बारीक घड्याळाची मागणी केली होती!

---

**अणुशक्तीवर चालणारीं विमानें**—अमेरिकेच्या अटॉमिक एनर्जी कमिशनचे सेक्रेटरी मि. लुई स्ट्रॉस ह्यांनीं कॉंग्रेसला अशी माहिती सांगितली कीं, अणुशक्तीवर उड्डाण करणारीं विमानें तयार करण्यासाठी अमेरिकेंत नव्या दिशेनें प्रयत्न करण्यांत येत आहेत. ह्या प्रयत्नांना झपाट्यानें यश येत असल्याचेंहि त्यांनीं बोलून दाखविलें.

---

## LORD REAY M. INDUSTRIAL MUSEUM POONA

The following new books have been received:

(1) **Sailmaking Simplified**: by Alen Grey. Publisher: The Rudder Publishing Co, 9 Murry Street, New York pp. 134.

(2) **Check List of Native and Naturalised Trees of United States.** Agri. Hand Book No. 41. Published by Forest Service, U. S. Department of Agriculture. pp. 472 Price: $ 2.

(3) **The Elementary School**: by Peaves W. C. Pieree P. R. & Stullken E. H. Published by of Chicago Press, Chicago, Illinois. pp. 571.

(4) **The Teaching of Reading**: by Paul McKee, Publisher: Houghton Miffin Company, Cambridge, Massachusetts. pp. C. 22.

(5) **History of Gas Industry**: by Louis Stotz, Published by the author. pp. 534.

## एस्टेट ड्यूटीची वसुली अपेक्षेप्रमाणें नाहीं

भारत सरकारला एस्टेट ड्यूटीपासून अपेक्षित उत्पन्न मिळत नाहीं, असें दिसतें. ऑक्टोबर १९५३ पासून हा कर सुरू झाला, तेव्हांपासून १९५४ अखेर ८ कोटी रु. उत्पन्न होईल अशी अपेक्षा होती. पण, प्रत्यक्ष वसुली फक्त ४·५६ कोटी रु. झाली. बिगर-शेतीच्या एस्टेट ड्यूटीचे हे आकडे आहेत. जवळच्या नातेवाईकांत मालमत्ता वाटून टाकून कर चुकविण्यांत येतो, असें आढळून आलें आहे; त्यावर उपाययोजना काय करावी ह्याचा विचार चालू आहे.

---

## ४३/४% १९५५-६० कर्जाची परतफेड

२७ जुलै, १९२८ रोजीं काढलेल्या नोटिफिकेशनप्रमाणें भारत सरकारनें उभारलेलें वरील सर्व कर्ज १५ सप्टेंबर, १९५५ रोजीं फेडलें जाईल. त्या तारखेनंतर, कर्जावर व्याज मिळणार नाहीं.

---

**झेकोस्लोव्हाकिआकडून रेल्वे ट्रक्स**—भारत व झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्या दरम्यान प्राग येथें एका करारावर नुकत्याच सह्या करण्यांत आल्या. कराराप्रमाणें, भारत झेक सरकारकडून २,०५४ रेल्वे-ट्रक्स विकत घेणार आहे. ह्या ट्रक्स झेकोस्लोव्हाकिआंतील सरकारी मालकीच्या कारखान्यांत तयार करण्यांत येणार आहेत.

**मध्य-भारतामधील वीज-केंद्रें**—मध्य-भारताच्या पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत वीज उत्पन्न करणारीं पांच केंद्रें उभारण्यांत यावयाचीं होतीं. हीं सर्व केंद्रें ठरलेल्या कालावधीच्या बऱ्याच आधीं पूर्ण करण्यांत आलीं आहेत. शेवटच्या केंद्राचें उद्घाटन नुकतेंच करण्यांत आलें. नव्या वीज-केंद्रांसाठी २·२८ कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली होती.

**जागतिक बँकेचें ऑस्ट्रिआला कर्ज**—पश्चिम ऑस्ट्रिआंत बांधण्यांत येणाऱ्या वीज निर्मितीच्या धरणासाठी जागतिक बँकेनें २५ वर्षे मुदतीचें कर्ज मंजूर केलें आहे. कर्जाची रक्कम युरोपिअन देशांच्या चलनांत मिळणार असून त्याची डॉलरमधील किंमत १ कोटी डॉलर्स आहे. व्याजाचा दर ४३/४ टक्के आहे. धरणाचें बांधकाम १९५८ सालीं पुरें होणार आहे.

**युगोस्लाव्हिआला ब्रह्मदेशाचा तांदूळ**—ब्रह्मदेश आणि युगोस्लाव्हिआ ह्या देशांत परस्परांशी आर्थिक सहकार्य करण्याचा करार करण्यांत आला आहे. उभयतां देशांनीं एकमेकांशीं होणारा व्यापार वाढविण्याचा हा प्रयत्न आहे. कराराच्या अटींप्रमाणें युगोस्लाव्हिआ ब्रह्मदेशाकडून दरवर्षी ५०,००० टन तांदूळ आयात करणार आहे.

---

**Bank of Maharashtra Ltd., Poona 2**

Wanted Commerce graduates or Arts graduates with economics, with previous banking experience for Junior Officers' posts. Pay:—100-10-150 E. B. 10-200 plus usual D/A. A higher start may be given in deserving cases. Apply to the MANAGER, before 7th July 1955.

C. V. Joag, F. I. B. (London).
Manager.

## ट्रेड युनियनांच्या संख्येंत वाढ

### ७०९ युनियनांचे ७·३७ लाख सभासद

१९४७ नंतर मुंबई राज्यांतील नोंदविलेल्या ट्रेड युनियनांच्या संख्येंत जी वाढ दिसून येते ती १९५३–५४ सालींहि तशीच चालू राहिली, व या वर्षीं नोंदविलेल्या ट्रेडयुनियनांची संख्या ७१२ वरून ८१७ वर गेली.

संघटना स्थापून स्वतःची परिस्थिति सुधारण्याबाबत कामगारांमध्यें जागृति निर्माण झाली असून मध्यवर्ति कामगार संघटनांनींहि प्रयत्न केल्यामुळें ट्रेडयुनियनांच्या संख्येंत ही वाढ झाली आहे. अहवालविषयक वर्षांत १९७ ट्रेड युनियनांची नोंद करण्यांत आली असून १९४९–५० सालानंतर कोणत्याहि एका वर्षांत एवढा वाढ झाली नव्हती. १९४९–५० सालीं मात्र २२१ युनियनें नोंदविण्यांत आलीं होतीं.

या १९७ युनियनांपैकी ७३ उत्पादकांच्या गटांतील, ३४ संकीर्ण गटांतील, प्रत्येकी २७ व्यापार व वाहतूक आणि दळणवळण गटांतील, २६ सर्व्हिसेस गटांतील, ५ वीज, पाणी आणि स्वच्छता सर्व्हिसेस गटांतील, ३ शेतकी व तत्सम गटांतील आणि २ बांधकाम गटांतील होती.

१९५३–५४ चे वार्षिक तक्ते सादर न केल्याबद्दल १०२ युनियनांचें रजिस्ट्रेशन रद्द करण्यांत आलें. यांपैकी ३६ युनियनें १९५३–५४ सालीं नोंदविण्यांत आलीं होतीं, २० युनियनें १९५२–५३ सालीं नोंदविण्यांत आलीं होतीं, तर उरलेलीं ४६ युनियनें दोन वर्षांचीं जुनीं होतीं. याचा अर्थ, हीं युनिअनें कांहीं तात्कालिन कायद्याखालीं स्थापन करण्यांत आलीं होती व तें काम झाल्यावर तीं चालूं ठेवण्याविषयीं त्यांना आस्था नव्हती असें दिसून येतें.

अहवालाच्या वर्षाच्या अखेरीस ८१२ युनियनें रजिस्टरवर होतीं. त्यांपैकी ७६६ राज्य युनियनें होतीं. यांत एक फेडरेशनाहि येतें. ४६ मध्यवर्ति युनियनें होती व त्यांत एक फेडरेशन होते. ज्या युनियनांचें कार्य एका राज्यापुरतें मर्यादित नाहीं तीं मध्यवर्ति युनियनें होत.

६८२ युनियनांनीं आपले तक्ते सादर केले. पैकी ४८६ युनियनांचे तक्ते योग्य तऱ्हेनें आलेले होते व ते अहवालासाठी मान्यहि करण्यांत आले. या ४८६ युनियनांपैकी ४६२ राज्य युनियने होती (यांतच एका फेडरेशनचाहि समावेश होतो) आणि २४ मध्यवर्ति युनियनें (यांतच एका फेडरेशनचाहि समावेश होतो) होती.

#### सभासद संख्या

अहवालांत समाविष्ट केलेली ४८१ युनियनांची सभासद संख्या (पांच फेडरेशनें वगळून) १९५३–५४ च्या सुरुवातीस ३,९१,९०९ इतकी होती. आणि वर्षअखेरीस ती ४,१६,३९६ इतकी होती. या वर्षी एकूण १,६०,६०८ इसम युनियनांचे सभासद झाले, तर १,३५,८२१ लोकांनीं सभासदत्व सोडलें. अहवालांत समाविष्ट करण्यांत आलेली सभासदांची सरासरी संख्या १९४५–४६ सालीं २,६०२ होती ती गेल्या वर्षांत बरीच कमी झाली व १९५३–५४ साल अखेरीस ती फक्त८६६ झाली. १९५३–५४ अखेरीस सर्व म्हणजे ८०७ युनियनांची (पांच फेडरेशनें वगळून) एकूण संख्या अंदाजें ७,३७,२४० होती तर १९५२–५३ अखेरीस ७०९ युनियनांची (तीन फेडरेशनें वगळून) संख्या ६,९३,२५५ इतकी होती.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
स्थापना: १९१८
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,२९,०००
रिझर्व रु. ६,०९,६००
ठेवी रु. १,२१,००,०००
शाखा – दादर, माहीम, बेळगांव, पुणें.

#### उत्पन्न आणि खर्च

अहवालाच्या वर्षीं ४४१ युनियनांचें एकूण उत्पन्न (यांत पांच फेडरेशनच्या उत्पन्नाचा समावेश नाहीं) रु. १७,७०,३१५ इतकें होतें व वर्षाच्या सुरुवातीस त्यांची शिल्लक रु. १५,०९,७७३ होती तर याच कालावधींतील त्यांचा एकूण खर्च रु. १४,७१,०८९ इतका होता. वर्षअखेरीस त्यांची शिल्लक रु. १८,०८,१७९ इतकी होती. पांच फेडरेशनांचें एकूण उत्पन्न (एक मध्यवर्ति व चार राज्य फेडरेशनें) रु. ३,११,९३२ होतें. वर्षाच्या सुरुवातीस त्यांची शिल्लक २,५४,४२८ होती. त्यांचा खर्च रु. २,९५,२८० होती आणि वर्षअखेरीस त्यांची शिल्लक रु. २,८९,१०० इतकी होती.

**पुण्यांत बुद्धाचें देऊळ**—भारतीय बुद्ध जन-समिति ही संस्था पुण्यांत बुद्धाचें एक मोठें देऊळ बांधण्याचा विचार करीत आहे असें समजतें. देवळासाठी योग्य जागा निवडण्यांत येत आहे. ह्या बौद्ध केंद्रांत बुद्धविषयक पाली व संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें करण्यांत येतील.

कोयनेच्या धरणास सुरुवात–

औद्योगिक महाराष्ट्राचें स्वप्न कोयना धरणाच्या सुरुवातीचें काम चालूं झाल्यानें साकार होऊं लागलें आहे. कोयनेच्या वाया जाणाऱ्या वाहत्या पाण्याला प्रचंड धरण बांधून तेथें जें शक्तिशालि विद्युत्पादन केंद्र निर्माण होईल त्या विजेवर महाराष्ट्रांत कारखाने व ग्रामीण उद्योग चालतील.

पंचवार्षिक योजनेंतील कोयना धरण एक महत्त्वाचा भाग असून क्रोडो रुपये त्यासाठी खर्ची पडणार आहेत. जनतेनें काटकसरीनें पैसे सांठवून अशा योजना व कारखानदारीसाठी पैसा पुरविला पाहिजे. आपले पैसे सुरक्षित ठेवून योग्य कार्याकडे अशा संपत्तीची शक्ति लावण्यास बँक ऑफ महाराष्ट्र लि. आपणांस मदत करील.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

मुख्य कचेरी: थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.
चिं. वि. जोग
मॅनेजर

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

मोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जे देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ / तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | १६,००,००० |
| | रु. | ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. | ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. | ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. | १२,७०,२७,००० |

### १६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



स्थापना सन १९३५ टे. न. २४५१८

## दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ८०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दांडेकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी., ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पां. ढोरे,
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.



## बँक ऑफ पूना लि.

( शेड्यूल्ड बँक )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. | २५,००,००० |
| वसूल | रु. | १२,५०,००० |

मुख्य कचेरी :—४५५ रविवार, पुणें

शाखा:—(१) सदाशिव पेठ, पुणें २
(२) डेक्कन जिमखाना चौक, पुणें ४.
(३) सोलापूर (४) सांगली

★

पुणें व सांगली येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय.
बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

★

जी. जी. साठे — मॅनेजर
डी. आर. नाईक जे. पी. — चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.